क्रमांक :- पोमसं/३१/वै.देयके/कागदपत्रे/१८४०/२०२१, मुंबई, दि. 29/१०/२०२१

संदर्भ :-शासन निर्णय, गृहविभाग क्र.आरएमई-०११७/प्र.क्र.४६/पोल-५ब, दि.१९/०१/२०२१

विषय :- वैद्यकिय देयकासोबत जोडावयाच्या कागदपत्रांबाबत.

****

## परिपत्रक

सन २०२० व २०२१ मध्ये कोरोना आजाराने सर्व भारतात जिवीताची व आर्थीक हानी झाली होती. सर्व हॉस्पीटल कोरोनाच्या रुग्णांनी भरली होती. त्यावेळी महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार तसेच कुटूंबियांनी उपलब्ध असलेल्या हॉस्पीटलमधुन उपचार करुन घेतले आहेत. आकस्मिक काळात उपचार केल्यामुळे पॅनलवर असलेल्या हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल करणे शक्य झाले नाही. उपचाराकरीता करण्यात आलेल्या खर्चाचे वैद्यकिय देयक तयार करुन वरिष्ठांकडेसादरकरण्यात आली असता जाचक अटी टाकून किंवा वारंवार त्रुटी काढून वैद्यकिय देयक परत पाठविण्यात येतात. सदरचे वैद्यकिय देयक सादर करताना त्यामध्ये सर्व प्रकारची प्रमाणपत्रे देण्यात आलेली असतानासुध्दा, ज्या पॅनलवरील हॉस्पीटलमध्ये उपचार केलेला नाही, अशा हॉस्पीटलमधून सदरील उपचार आमच्या हॉस्पीटलमध्ये होत नाही असे प्रमाणपत्र आणण्यास तगादा लावत आहेत. पॅनलवरील हॉस्पीटल हे सदरचे प्रमाणपत्र देण्यास नकार देत असल्यामुळे संबंधीत अधिकारी/अंमलदार यांना आर्थिक व मानसिक त्रास होत आहे, असे मा.पोलीस महासंचालक यांच्या निदर्शनास आले आहे.

तरी खालील घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी व अंमलदार हे जेव्हा त्यांची वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देयके सादर करतील तेव्हा त्यांचेकडून शासन निर्णय, गृहविभाग, क्र.आरएमई ०११७/प्र.क्र.४६/पोल-५ ब, दि.१९/०१/२०१७ मध्ये नमुद केलेल्या चेकलिस्टनुसारच कागदपत्रे मागविण्यात यावीत. तसेच त्यांना कोणत्याही प्रकारचा मानसिक त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी सादर केलेली देयके लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत संबंधिताना सुचना द्याव्यात.

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त, (रेल्वेसह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नागरीहक्कसंरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणेसंचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/विशेष कृती दल, नागपूर
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षणकेंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षणकेंद्रे/अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गटक्र. १ ते १६